**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

अधिवेशनाचा शुभारंभ "वंदे मातरम्" या गीताच्या समूह गायनाने झाला.

**पृ.शी./मु.शी.**: सदस्यांचा परिचय

श्री. अजित पवार ( उप मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित श्री.धनंजय पंडितराव मुंडे यांचा आपणास व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे.

सभापती महोदय, औरंगाबाद तथा जालना स्थानिक प्राधिकारी संस्था मतदार संघातर्फे निर्वाचित श्री.सुभाष माणकचंद झांबड यांचा आपणास व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे.

-----

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

**पृ.शी.**: शोक प्रस्ताव

**मु.शी.**: दक्षिण आफ्रिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष, भारतरत्न डॉ.नेल्सन मंडेला यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव

श्री.अजित पवार ( उप मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, दक्षिण आफ्रिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष, भारतरत्न डॉ.नेल्सन मंडेला यांच्या निधनाबद्दल मी खालील शोक प्रस्ताव मांडतो.

"दक्षिण आफ्रिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष, भारतरत्न डॉ.नेल्सन मंडेला यांच्या निधनाबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करते."

दक्षिण आफ्रिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष, सामाजिक समतेसाठी अहिंसेच्या मार्गाने आयुष्यभर संघर्ष करणारे, जागतिक वर्णभेद विरोधी लढयाचे प्रणेते, भारतरत्न डॉ. नेल्सन मंडेला यांचा जन्म दक्षिण आफ्रिकेतील इस्टर्न केप प्रांतातील कूनू येथे झाला. त्यांनी कायद्याची पदवी घेतल्यानंतर राष्ट्रपिता महात्मा गांधीजींची प्रेरणा घेवून दक्षिण आफ्रिकेत वर्णभेदविरोधी आंदोलन उभे केले. अनेक शतकांपासून या देशातील कृष्णवर्णीयांवर होत असलेल्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी त्यांनी आफ्रिकन नॅशनल काँग्रेसच्या कार्यात स्वत:ला झोकून दिले. 1950 मध्ये ते आफ्रिकन नॅशनल काँग्रेसच्या युथ लिगचे अध्यक्ष बनले. दक्षिण आफ्रिकेतील कृष्णवर्णीय जनतेला त्यांच्या हक्काची जाणीव करुन देऊन डॉ. मंडेला यांनी त्यांचे व्यापक संघटन केले व मोठा लढा उभा केला. या संघर्षात दोषी ठरवून डॉ. मंडेला यांना 11 जुलै, 1964 रोजी आजीवन कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली. अखेर 11 फेब्रुवारी, 1990 रोजी प्रदीर्घ कालावधी नंतर म्हणजे तब्बल 27 वर्षानंतर त्यांची तुरुंगातून सुटका करण्यात आली.

नंतर श्री.शिगम.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार...
मात्र त्यानंतर देखील ते आपल्या निश्चयापासून ढळले नाहीत. त्यांनी पुन्हा वर्णभेदविरोधी लढा उभा केला. दक्षिण आफ्रिकेत लोकशाही राजव्यवस्था प्रस्थापित व्हावी आणि त्यासोबतच वर्णभेदाचे समूळ उच्चाटन व्हावे यासाठीचे त्यांचे आंदोलन जोर धरु लागले. त्यांच्या या आंदोलनामुळे 1993 मध्ये दक्षिण आफ्रिकेत अंतरिम राज्यघटना तयार होवून कृष्णवर्णीयांना मूलभूत हक्क प्रदान करण्यात आले. 1994 मध्ये दक्षिण आफ्रिकेत प्रथमच वर्णभेद विरहित सार्वत्रिक निवडणूक झाली. त्यात डॉ. मंडेला यांच्या आफ्रिकन नॅशनल कॉंग्रेसला प्रचंड बहुमत मिळाले. 10 मे, 1994 रोजी डॉ. नेल्सन मंडेला दक्षिण आफ्रिकेचे पहिले कृष्णवर्णीय राष्ट्राध्यक्ष झाले. दक्षिण आफ्रिकेतील वर्णद्वेषी राजवटीविरोधात दिलेला लढा आणि अखेर त्या देशात आलेली लोकशाही हे डॉ. मंडेला यांचे फार मोठे यश होते.

डॉ. मंडेला यांनी 1994 ते 1999 पर्यंतच्या आपल्या राष्ट्राध्यक्ष पदाच्या काळात अनेक समाजहिताचे निर्णय घेऊन दक्षिण आफ्रिकेला एक देश म्हणून उभे करण्यात यशस्वी झाले. अलिप्त राष्ट्रांच्या चळवळीत सामील होवून दक्षिण आफ्रिकेला वेगळ्या उंचीवर नेले. त्याचबरोबर अलिप्त राष्ट्र चळवळीला बळ दिले आणि जागतिक राजकारणात आपला ठसा उमटविला. जगात शांतता निर्माण व्हावी यासाठी त्यांनी प्रामाणिक प्रयत्न केले. त्यांनी जुलूम आणि अन्यायाच्या विरोधात आपल्या लोकांच्या स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठेसाठी अत्यंत चिकाटीने आणि त्यागाने अहिंसेच्या मार्गाने लढा उभा करुन एक नवीन सामाजिक क्रांती घडविली. या त्यांच्या कार्याबद्दल सन 1990 मध्ये त्यांना भारत सरकारने "भारतरत्न" हा सर्वोच्च पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला. सन 1991 मध्ये युनेस्कोचा "शांतता पुरस्कार", तर सन 1993 मध्ये त्यांना जागतिक शांततेचा "नोबेल पुरस्कार" बहाल करण्यात आला. तसेच अमेरिकेने "टाईम्स पर्सन ऑफ द इयर", कॅनडाने "क्वीन एलिझाबेथ टू गोल्डन ज्युबिली मेडल", संयुक्त राष्ट्रसंघाने "ऑर्डर ऑफ द निल" या सर्वोच्च पुरस्काराने गौरविले होते. जगभरातील अनेक देशांकडून राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या अडीचशेहून अधिक पुरस्कारांनी त्यांचा गौरव केला होता. 50 पेक्षा जास्त आंतरराष्ट्रीय विद्यापीठांनी त्यांना मानद पदवी बहाल केली होती.

मानवी हक्काच्या लढयासाठी आयुष्यभर झटणाऱ्या उत्तुंग व्यक्तिमत्त्व लाभलेल्या या शांतीदूताचे शुक्रवार, दिनांक 6 डिसेंबर, 2013 रोजी दु:खद निधन झाले. डॉ. नेल्सन मंडेला यांच्या निधनामुळे दक्षिण आफ्रिकेतील जनतेने आपला राष्ट्रपिता व जागतिक दर्जाचा सामाजिक परिवर्तनवादी क्रांतीकारी नेता गमावला आहे. त्यांचे जीवन आणि त्यांनी जपलेली जीवनमूल्ये आपणा सर्वांना सातत्यपूर्ण प्रेरणा व मार्गदर्शन देत राहतील. त्यांच्या निधनाबद्दल मी तीव्र दु:ख व्यक्त करतो.

--

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते आदरणीय श्री.अजितदादा पवार यांनी दक्षिण आफ्रिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष भारतरत्न डॉ. नेल्सन मंडेला यांच्या निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडला आहे त्याला समर्थन देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, दक्षिण आफ्रिकेतील वर्णभेदाची माहिती आमच्यासारख्या पिढीला झ ाली ती दक्षिण आफ्रिके बरोबर अन्य देश क्रिकेट खेळत नव्हते त्यामुळे झाली. दक्षिण आफ्रिकेबरोबर अन्य देश क्रिकेट खेळत नव्हते. त्यामुळे त्यांच्यावर एक मोठा जागतिक दबाव निर्माण झाला. दक्षिण आफ्रिकेमध्ये अगदी टोकाचा वर्णभेद होता. कृष्ण वर्णियांना तेथे अगदी दुय्यम दर्जाची वागणूक दिली जात होती. या वर्णभेदाविरुध्द डॉ. नेल्स मंडेला यांनी संघर्ष उभा केला. परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अब्राहम लिंकन, मार्टिन ल्युथर किंग या सर्वांच्या तोडीचे काम, एक चळवळ, एक संघर्ष डॉ. नेल्सन मंडेला यांनी दक्षिण आफ्रिकेमध्ये उभा केला. दक्षिण आफ्रिकेमध्ये इतका वर्णद्वेष होता की, एखादा कृष्णवर्णीय विद्यार्थी शाळेत गेला तर तेथील गोरी माणसे कृष्णवर्णीय विद्यार्थ्याला कधीच नावाने हाक मारीत नसत. शिक्षक स्वत: त्या विद्यार्थ्यांचे नाव ठेवीत असत आणि त्या नावाने त्याला हाक मारीत असत. नेल्सन मंडेला यांचे मूळ नाव डोली लाला असे होते.

...नंतर श्री.गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

त्यांचा नावाचा अर्थ फांद्या तोडणारा किंवा वादळ निर्माण करणारा असा होतो. ते ज्या शाळेत गेले, त्या शाळेतल्या शिक्षिकेने त्यांचे नाव नेल्सन असे ठेवले. शिक्षिकेने त्यांचे नेल्सन नाव ठेवले, ते नाव त्यांनी आपल्या संपूर्ण जीवनात सार्थक केले. त्यांनी त्यांच्या आयुष्यात अतिशय कठीण संघर्ष केला केला. कठीण संघर्ष करीत असताना ते शिक्षा भोगण्यासाठी जेलमध्ये गेले होते. जेलमध्ये गेल्यानंतर तेथील जेलच्या अधिकाऱ्यांनी त्यांना खंदक खोदण्यास सांगितले. खंदक खोदत असताना नेल्सन मंडेला यांना वाटले की, या खंदकांमध्ये आपल्याला बुजवणार आणि आपले आयुष्य संपविणार. नेल्सन मंडेला यांना खंदक खोदण्याचे आदेश दिल्याप्रमाणे त्यांनी खंदक खोदला आणि तेथील जेल अधिकाऱ्यांनी त्यांना सांगितले की, आपण या खंदकात झोपा. नेल्सन मंडेला त्या खंदकात झ ोपल्यानंतर जेल अधिकाऱ्यांनी त्यांच्या अंगावर लघवी केली. हा प्रकार त्या जेलमध्ये नित्याने चालत होता.

मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, नेल्सन मंडलेला हे राष्ट्राध्यक्ष झाले. त्यानंतर त्यांनी तेथील जेल अधिकाऱ्यास सन्माननीय निमंत्रित करुन त्यांचा यथोचित सन्मान केला. टोकाचा अवमान, टोकाची घृणास्पद वागणूक देऊन सुध्दा, त्यासंबंधी वचपा न काढता त्यांनी आपली क्षमाशीलता दाखवून आपण आपल्या राष्ट्राला एक चांगला आदर्श घालून देऊ शकतो या दृष्टीने भूमिका केली. ते दक्षिण अफ्रिकेचे राष्ट्राध्यक्ष झाले, त्यावेळी त्या राष्ट्रात मोठ्या प्रमाणात बेरोजगारी होती, जनतेला पिण्याचे पाणी मिळत नव्हते या समस्यातून त्यांनी देशाला बाहेर काढले. तसेच ते मार्क्सवादी होते तरी त्यांनी लोकशाही प्रस्थापित करुन लोकांचा विकास अधिक गतीने केला. लोकांसाठी अनेक विकासात्मक कामे करुन त्यांनी त्यांच्या राष्ट्राचे खऱ्या अर्थाने पुनरुज्जीवन केले. मला वाटते की, ते पुनरुज्जीवनाचा लाभ दक्षिण अफ्रिकेतील सामान्य माणसाला झाला आणि जे भारतीय मजूर तेथे कामासाठी गेले त्यांना देखील मिळाला आहे. भारतीय लोकांनी दक्षिण अफ्रिकेत उद्योग सुरु केले आहेत व करीत आहेत, त्याचे पूर्णपणे श्रेय नेल्सन मंडला यांच्या कार्यप्रणालीला जाते. जॉर्ज फर्नांडिस हे जेलमध्ये असताना त्यांनी निवडणूक जिंकली असे राजकीय वर्तुळात आपण नेहमी ऐकतो. परंतु 27 वर्षे जेलमध्ये राहून इतकी प्रचंड क्षमता, एवढी प्रचंड ताकद त्यांनी संपूर्ण जगास एका वेगळया व्यक्तिमत्वाने दाखवून दिली आहे. नेल्सन मंडेला हे महात्मा गांधी यांना आदर्श मानत होते असे त्यांचे दुसरे व्यक्तिमत्व होते. मी दूरदर्शनवर नेल्सन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

मंडेला यांचे वेगवेगळे कार्यक्रम पहावयाचो. महात्मा गांधी हे साध्या पंच्याच्या पेहरावात असावयाचे परंतु नेल्सन मंडेला यांचे रंगीबेरंगी शर्ट असावयाचे. त्यांचे व्यक्तिमत्व रुबाबदार होते, त्याप्रमाणेच त्यांचे राहणे होते. अशा चळवळीतील माणसाचा चेहरा आणि रुबाबदार पेहराव वेगळा असला तरी ते सर्वसामान्य माणसांना प्रेरणा देत हाते. त्यांचा लढा हा सर्वदूर होता. तो लढा हा अतिशय स्पष्ट होता. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांशी मैत्री होती, तरी त्यांनी इराकवरील हल्ल्यास तेवढाच विरोध केला. ही सर्व किमया म्हणजे त्यांच्या व्यक्तिमत्वाचा एक दरारा होता, त्यांच्या व्यक्तिमत्वाचा एक प्रभाव होता. त्या प्रभावामुळे एका देशात लोकशाहीची निर्मिती झाली आणि आज त्या देशातील नागरिक लोकशाहीमुळे समाधानी आहेत.

भारताने त्यांना "भारतरत्न" पुरस्कार देऊन त्यांचा यथोचित गौरव केला. या चळवळीकडे बघण्याचा भारताचा दृष्टीकोन काय आहे, त्याबाबतीतही भारताने आपली भूमिका स्पष्ट केली होती. ज्या भारतीय राज्यकर्त्यांना गरीब सामान्य माणसांसाठी काम करावयाचे आहे त्यांनी नेल्सन मंडेला यांची प्रेरणा, त्यांचे व्यक्तिमत्व, डोळयासमोर ठेवावे. अशा थोर व्यक्तिमत्वाला माझ्या पक्षातर्फे, विरोधी पक्षातर्फे तसेच सर्वांतर्फे आदरांजली अर्पण करतो.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, या सभागृहाचे नेते माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी जो शोक प्रस्ताव मांडला आहे त्यावर माझ्या सहवेदना व्यक्त करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, आपल्या सर्वांना नेल्सन मंडेला यांचा परिचय आहेच. एक धडाडीचा झुंझार नेता, ज्याने वर्णभेदाबद्दल निकराने लढा दिला. वर्णद्वेषाचा फटका परमपूज्य महात्मा गांधी यांना देखील सोसावा लागला हे आपण विसरता कामा नये. अन्यायाविरुध्द अनेक लोकांनी लढा दिला. परंतु त्यापैकी अग्रक्रमाने आपण नेल्सन मंडेला यांचे नाव घेतो.

सभापती महोदय, भारत सरकारने त्यांना भारतरत्न पुरस्काराने गौरविले होते. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले की, वर्णभेदाविषयी त्यांनी लढा दिला. दक्षिण आफ्रिका हा मागासलेला देश होता. आपल्या राष्ट्राध्यक्ष पदाच्या काळात त्या देशाला ऊर्जितावस्था प्राप्त करुन देण्याचे काम नेल्सन मंडेला यांनी केले. त्यांनी दक्षिण आफ्रिका देशाची अंतरिम घटना तयार केली आणि कृष्णवर्णियांना त्यांचे मूलभूत हक्क कसे मिळतील या विषयी अथक प्रयत्न केले.

सभापती महोदय, नेल्सन मंडेला यांचा भारत सरकारने "भारतरत्न" हा सर्वोच्च पुरस्कार देऊन गौरव केला. युनेस्कोने 1991 मध्ये त्यांना शांतता पुरस्कार बहाल केला. 1993 मध्ये त्यांना जागतिक शांततेचा नोबेल पुरस्कार देण्यात आला. अमेरिकेने "टाईम्स पर्सन ऑफ द इयर", कॅनडाने "क्वीन एलिझाबेथ टू गोल्डन ज्युबिली मेडल", संयुक्त राष्ट्रसंघाने "ऑर्डर ऑफ द निल" या सर्वोच्च पुरस्काराने त्यांना मानांकित केले होते. 50 पेक्षा जास्त आंतरराष्ट्रीय विद्यापीठांनी त्यांना मानद पदवी बहाल केली होती. नेल्सन मंडेला यांच्या दु:खद निधनामुळे जगाचे खूप मोठे नुकसान झाले आहे असे मी मानतो. माझ्या पक्षातर्फे आणि माझ्यातर्फे नेल्सन मंडेला यांना मी श्रध्दांजली वाहतो आणि त्यांच्या निधनाबद्दल तीव्र शोक व्यक्त करतो.

------

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, आमच्या पिढीने महात्मा गांधी यांना पाहिलेले नव्हते. कॉंग्रेस पक्षाचे शताब्दी अधिवेशन झाले त्या दिवशी ब्रेबॉर्न स्टेडियमवर सरहद्द गांधींना डोळे भरुन पाहता आले. आजही तो सहा फुटाहून अधिक ऊंच माणूस डोळ्यात साठून आहे. महात्मा गांधींचे निधन झाले त्यावेळी आइन्स्टाईन असे म्हणाले होते की, असा हाडामासाचा जिताजागता माणूस या पृथ्वीतलावर होऊन गेला यावर कदाचित पुढची पिढी विश्वास ठेवणार नाही. काही दिवसांपूर्वी युसेन बोल्ट याने सांगितले की, असा जिताजागता माणूस या पृथ्वीतलावर होता त्याचे नाव नेल्सन मंडेला आहे.

सभापती महोदय, या व्यक्तीने 27 वर्षे अनन्वित अत्याचार भोगले. रॉबिन बेटावर केवळ 7X9 म्हणजे 63 फुटाच्या खोलीत 27 वर्षे त्यांनी आयुष्य कंठले. त्यांना बैलाच्या घाणीला जुंपले गेले होते. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी उल्लेख केलेल्या घृणास्पद कृत्यांना त्यांना सामोरे जावे लागले, तरीही मनात कोणाविषयी कटुता निर्माण झाली नाही. त्यांनीच खणलेल्या कबरीमध्ये जेलरने त्यांना गाडून वरुन लघुशंका केली. तरी सुध्दा त्या माणसाबद्दल त्यांच्या मनात कटुता निर्माण झाली नाही. आपल्याला तर शेजाऱ्याचा त्रास होतो. दुसऱ्या रंगाचा, दुसऱ्या धर्माचा, दुसऱ्या जातीचा त्रास होतो. परंतु नेल्सन मंडेला यांनी राष्ट्राध्यक्ष पदाची शपथ घेतली तेव्हा घृणास्पद वागणूक देणाऱ्या जेलरला सन्मानाने बोलावून त्याला सन्मानाची वागणूक दिली. द्वेष नावाचा लवलेश त्या माणसामध्ये नव्हता. म्हणून महात्मा गांधीचे ते सच्चे अनुयायी होते. या जगातील काळ्या लोकांना अनन्वित अत्याचार भोगावे लागले, या देशातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दलितांसाठी दिलेला अभूतपूर्व लढा आपल्याला माहिती आहे. काळा रंग केवळ दुसऱ्याचा आहे म्हणून त्याच्याबद्दल कमालीचा द्वेष गो-या राजवटीने जगभर निर्माण केला. वर्णभेदाच्या विरोधात लढल्यानंतर आणि सत्ता प्राप्त झाली तेव्हा देखील त्यांनी गोऱ्यांना सोबत घेण्याचे काम केले. त्यांनी असे म्हटले नाही की, मी आता सूड घेईन.

नंतर श्री.भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील....

ते असे म्हणाले की, मला गोऱ्यांचे व काळ्यांचे वर्चस्व मान्य नाही. दोघांना बरोबर घेऊन मला राज्य निर्माण करावयाचे आहे.

सभापती महोदय, काळा रंग हा आश्वासक आहे. आपल्या मातीचा रंग काळा आहे. आपण मातीला काळी आई म्हणतो. आपला विठ्ठल काळा आहे. आपण काळ्याला वाईट मानले आणि गोऱ्यांना मोठे मानले. माणसानेच निर्माण केलेल्या या भेदा विरोधात जी माणसे लढतात तीच माणसे जगात महान होतात, अमर होतात. अशानेच डॉ.नेल्सन मंडेला अमर झाले आहेत.

सभापती महोदय, ज्या बोधी वृक्षा खाली सिद्धार्थचा महात्मा गौतम बुद्ध झाला, तो बोधी वृक्ष पुष्पश्रुंग मित्राने उपटून टाकला होता. पुढे त्या वृक्षाच्या एका फांदीचा मोठा वृक्ष श्रीलंकेमध्ये झाला. नंतरच्या काळात त्या वृक्षाची एक फांदी तोडून आपल्या येथे आणण्यात आली. या देशामध्ये द्वेष, मत्सर, भेदभाव, या भावनेतून गांधी नावाचे एक रोपटे उपटून टाकले. जे येथून आज हरवलेले आहे. पण दक्षिण अफ्रिकेत त्या रोपट्याचे एक प्रचंड झाड झाले आहे. जमले तर दक्षिण अफ्रिकेतून एक फांदी तोडून येथे आणली पाहिजे आणि पुन्हा एकदा हे झाड तगवले पाहिजे. हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. मी लोकभारती पक्षातर्फे डॉ.नेल्सन मंडेला यांना अभिवादन करतो, त्यांच्या विचारांना अभिवादन करतो. धन्यवाद.

.....

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते आणि माननीय उप मुख्यमंत्री यांनी दक्षिण अफ्रिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष, भारतरत्न डॉ.नेल्सन मंडेला यांच्या दु:खद निधना निमित्त जो शोक प्रस्ताव मांडला आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

दक्षिण अफ्रिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष, भारतरत्न डॉ.नेल्सन मंडेला यांचे दिनांक 6 डिसेंबर 2013 रोजी दु:खद निधन झाले. आयुष्यभर संघर्ष करणारे व जागतिक वर्णभेद विरोधी लढ्याचे प्रणेते म्हणून त्यांची जगभर ओळख होती. दक्षिण अफ्रिकेतील कृष्णवर्णीय जनतेला त्यांच्या हक्कांची जाणीव करून देऊन दक्षिण अफ्रिकेत लोकशाही राज्य प्रस्थापित करण्याचे महत्त्वाचे काम डॉ.नेल्सन मंडेला यांनी केले. यासाठी त्यांना तब्बल 27 वर्षे तुरूंगवास भोगावा लागला. अशा या शांतिदूताचे निधन झाल्याने मी माझ्या पक्षाच्या वतीने त्यांच्या दु:खद निधना निमित्त भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

.....

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते व राज्याचे सन्माननीय उपमुख्य मंत्री श्री. अजित पवार यांनी जो शोक प्रस्ताव मांडला आहे त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे.

दक्षिण अफ्रिकेचे पहिले कृष्णवर्णीय माजी राष्ट्राध्यक्ष, भारतरत्न डॉ.नेल्सन मंडेला यांचे निधन ज्यांनी या देशातील जातीयता, विषमता नष्ट केली त्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी म्हणजे दिनांक 6 डिसेंबर 2013 रोजी झाले. हा देखील एक योगायोग आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारामुळेच आज दलित समाजातील काही सन्माननीय सदस्य येथे उभे आहेत. महापरिनिर्वाण दिनी डॉ.नेल्सन मंडेला यांचे निधन व्हावे हा योगायोग आहे. गोरा आणि काळा यातील भेदभाव नष्ट व्हावा यासाठी डॉ.नेल्सन मंडेला यांनी आयुष्यभर संघर्ष केला. महात्मा गांधी यांच्याकडून डॉ.नेल्सन मंडेला यांनी प्रेरणा घेतली. त्यामुळे त्यांचा आज जगामध्ये दुसरे गांधी म्हणून नावलौकिक आहे. महात्मा गांधी यांनी जे काम केले ते कार्य त्यांनी आपल्या डोळ्या समोर आदर्श म्हणून ठेवले. डॉ.नेल्सन मंडेला यांनी गोरा आणि काळा वर्णभेदासंबंधात संघर्ष करताना समन्वय साधला आहे. त्यांनी संघर्ष करताना समन्वयाची भाषा ठेवली. ते आयुष्यभर झुंझले. जेलमध्ये राहिले. अशा या महान नेत्याला आमच्या काँग्रेस पक्षाच्या वतीने मी श्रद्धांजली वाहतो आणि इथेच माझे भाषण थांबवितो. जयहिंद.

.....

...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते आणि राज्याचे माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी भारतरत्न डॉ.नेल्सन मंडेला यांच्या दु:खद निधनाबद्दल आपले दु:ख व्यक्त करणारा शोक प्रस्ताव सभागृहा समोर ठेवला आहे.

सभापती महोदय, आपण द्याल त्या वेळे पेक्षा कदाचित दोन-तीन मिनिटे अधिक वेळ मी या विषयावर घेणार आहे. मागच्याच आठवड्यामध्ये मी श्री.जेफ्री आर्चर नावाच्या एका इंग्रजी लेखकाचे पुस्तक वाचत होतो. ब्रिटीशांचा वसाहतवाद कशा पद्धतीने फोफावत होता व नैसर्गिकदृष्ट्या समृद्ध असलेल्या जगभरातील विविध बेटांवर ब्रिटीशांनी आपल्या तुकड्या पाठवून तेथे स्वत:चा झेंडा रोवून कशा प्रकारे साम्राज्य प्रस्थापित केले हे दाखविण्याचे काम या पुस्तकात करण्यात आले आहे.

यानंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले ...

अशाच प्रकारे ब्रिटिशांनी दक्षिण आफ्रिकेवर साम्राज्य मिळवले होते. डॉ.नेल्सन मंडेला यांचे आदर्श महात्मा गांधी होते. मघाशी सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी खान अब्दूल गफ्फार खान यांचा उल्लेख केला होता. 15 दिवसापूर्वीच खान अब्दूल गफ्फार खान यांनी दिलेल्या लढयाच्या संदर्भात एका कॅनेडीयन निर्मात्याने तयार केलेली चित्रफीत मला बघावयास मिळाली होती. त्या चित्रफितीमध्ये अफगाणीस्तान,पाकिस्तान आणि भारतामध्ये आता काय वास्तव आहे तसेच येथील लोकांच्या प्रतिक्रियांचेही चित्रीकरण होते. अफगाणीस्तान,पाकिस्तान व भारतामध्ये ज्या ठिकाणी मोठ-मोठया बाजारपेठा होत्या त्या ठिकाणी जाऊन खान अब्दूल गफ्फार खान कोण होते, त्यांनी काय कार्य केले होते याची माहिती ही टीम घेत होती. परंतु खान अब्दूल गफ्फार खान यांच्या कार्याबद्दल कोणालाही माहिती नव्हती याचे दु:ख आहे.

वर्णद्वेषाविरुध्द संघर्ष करणारी आंतरराष्ट्रीय पातळीवरील जी व्यक्तिमत्व असतात त्यांनाही लोक आता विसरत चालले आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष श्री. बराक ओबामा यांनी डॉ.नेल्सन मंडेला यांना श्रध्दांजली वाहतांना म्हटले होते की, एक जबरदस्त, प्रभावशाली, धाडसी आणि माणुसकीचा झरा असलेल्या नेत्याला आज जग मुकले आहे. डॉ. मंडेला यांनी केलेला त्याग अनमोल आहे. त्यांच्या त्यागामुळे माझ्या सारख्या अनेकांनी सध्याची उंची गाठली आहे. डॉ.मंडेला नसते तर आमच्या जीवनाची आम्ही कल्पनाही करु शकलो नसतो. जगातील सर्वश्रेष्ठ सत्तेचा प्रमुख ज्यावेळेस डॉ. नेल्सन मंडेला यांच्या पुढे नतमस्तक होतो व त्यांचे कार्य काय होते हे जेव्हा सांगतो त्यावेळेला डॉ.नेल्सन मंडेला यांनी तुरुंगात काढलेली 27 वर्षे, त्यासाठी केलेला संघर्ष व आपले संपूर्ण आयुष्य पणाला लावून काळया गोऱ्यांमधील संघर्ष मिटवण्यासाठी अहिंसेच्या मार्गाने वाटचाल करत पुढे जाण्याचा घेतलेला निर्धार व त्यानंतर डॉ. नेल्सन मंडेला दक्षिण आफ्रिकेचे राष्ट्रपती झ
ाल्यानंतर काळया आणि गोऱ्या समाजाला एकजीव करुन काळा व गोरा वर्णभेद जगामधून कायमचा नष्ट व्हावा यासाठी अहिंसेच्या मार्गाने कायम सतत पुढे चालण्याची प्रेरणा गांधीजींच्या विचारातून देणारा असे एक आगळे वेगळे व कुणालाही मोह पडावा, अनुकरण करावे असे वाटणारे डॉ. नेल्सन मंडेला यांचे कर्तृत्व होते.

..2...

श्री. हेमंत टकले....

डॉ नेल्सन मंडेला यांनी लिहिलेले लाँग वॉक फॉर फ्रिडम हे आत्मचरित्र अतिशय गाजले आहे. डॉ. नेल्सन मंडेला यांच्या शोक प्रस्तावाच्या निमित्ताने माझी शासनाला विनंती आहे की, जर लाँग वॉक फॉर फ्रिडम या आत्मचरित्राचा मराठीतून अनुवाद झालेला नसेल तर त्या आत्मचरित्राचा अनुवाद मराठीतून करण्यात यावा व या आत्मचरित्राचा मराठीतून अनुवाद झालेला असेल तर त्याच्या प्रती राज्यातील सर्व शाळांमध्ये उपलब्ध करुन दिल्या जाव्यात एवढी विनंती आहे.

डॉ. नेल्सन मंडेला यांचे कर्तृत्व आकाशा एवढे असले तरीही जमिनीवर घट्ट पाय रोवून उभी राहिलेली ही व्यक्ती माणुसकीचा एक अप्रतिम नमुना होती. संपूर्ण जगातून भारतरत्न डॉ. नेल्सन मंडेला यांच्या बाबतीत जो शोक व्यक्त झाला तो शोकापुरता मर्यादित न राहता, त्याचा अर्थ समाजावून घेऊन वर्णभेद, जातीभेद, रंगभेद कायमचा कसा मिटेल, अहिंसेच्या मार्गाने जगामध्ये शांतता कशी प्रस्थपित कशी होईल यासाठी आपण कायम तत्पर असणे हीच त्यांना खरी श्रध्दांजली ठरेल. त्यामुळे मी माझ्या पक्षाच्या वतीने त्यांच्या व्यक्तिमत्वापुढे, त्यांच्या कार्यकर्तृत्वापुढे नतमस्तक होतो.

------

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, दक्षिण आफ्रिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष भारतरत्न डॉ. नेल्सन मंडेला यांच्या दु:खद निधनाबद्दलचा शोक प्रस्ताव या सभागृहाचे नेते व महाराष्ट्राचे उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी मांडला असून त्यावर विचार मांडण्यासाठी मी उभी आहे.

डॉ. नेल्सन मंडेला यांचे टोपण नाव मडीबा असे होते. डॉ. नेल्सन मंडेला यांचे भारताशी अद्वितीय असे नाते होते. ते 1990 मध्ये भारताच्या भेटीवर आले असतांना त्यांनी पत्रकारांना सांगितले होते की, भारतामध्ये जन्मलेल्या माणसातूनच मला प्रेरणा मिळालेली आहे. एकमेव अभारतीय डॉ. नेल्सन मंडेला यांनाच भारतरत्न पुरस्कार मिळालेला आहे.

डॉ. नेल्सन मंडेला यांच्या बरोबर तुरुंगात राहिलेले साथीदार डॉ. अहमद कायरडा आणि इस्माईल मीर हे सुध्दा भारतीयच होते. डॉ. नेल्सन मंडेला हे ज्यावेळेस तुरुंगात होते त्यावेळी शेक्सपीयरचे साहित्य पोहचविण्याची व्यवस्था सोनी व्यंकट रमण यांच्या पत्नीने केली होती.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

डॉ.नेल्सन मंडेला यांनी तुरुंगवासामध्ये त्यांना आलेले अनुभव डायरीमध्ये लिहिले होते आणि ती डायरी त्यांनी गवतामध्ये लपविली होती. सत्येंद्रनाथ महाराज बारा वर्षानंतर तुरुंगातून बाहेर आले त्यावेळी यांनी ती डायरी उपलब्ध करुन दिली. त्यानंतर त्या डायरीचे "लाँग वे टू फ्रीडम" हे पुस्तक तयार करण्यात आले.

सभापती महोदय, डॉ.नेल्सन मंडेला यांनी संयुक्त राष्ट्र संघाच्या ॲपरथाईड समितीवर श्री.ई.एस.रेड्डी यांची नियुक्ती केली होती. डॉ.नेल्सन मंडेला यांच्या मंत्रिमंडळातील सहा मंत्री भारतीय होते. डॉ.नेल्सन मंडेला यांचा जागतिक समानतेचा दृष्टीकोन होता म्हणून त्यांनी त्यांच्या मंत्रिमंडळामध्ये सर्व वर्णाच्या व्यक्तींचा समावेश केला होता. सन 1996 मध्ये डॉ.मंडेला यांनी जस्टीस ईस्माईल मेहमूद या भारतीय व्यक्तीची न्यायाधीश म्हणून नियुक्ती केली होती.

सभापती महोदय, एखादी व्यक्ती जिवंत असताना तिच्या नावे एखादी वास्तू उभारली जात नाही असा आपल्याकडे प्रघात आहे. परंतु दिल्ली येथील जामिया मिलिया इस्लामिया विद्यापीठात डॉ.नेल्सन मंडेला यांच्या नावे अभ्यास केंद्र आहे.

डॉ.नेल्सन मंडेला यांनी कोलकाता येथे भेट दिली होती त्यावेळी त्यांनी सांगितले होते की, "आमच्या येथे येणाऱ्या मजुरांपैकी 30-40 टक्के मजूर हे कोलकाता शहरातील आहेत. तेव्हा तुमची प्रेरणा स्थान, तुमचे विचार हे आम्हाला सुध्दा जवळचे आहेत." डॉ.नेल्सन मंडेला यांना नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या विचाराची ओळख या श्रमिकांमार्फत झाली होती ही वस्तुस्थिती आहे.

डॉ.नेल्सन मंडेला यांनी त्यांच्या आत्मचरित्रामध्ये म्हटले आहे की, "स्वातंत्र्याच्या वाटेवर फार लांबवर चालत आलो, या वाटेवर आपले पाऊल घसरणार नाही याची दर क्षणी खबरदारी घेतली. पण तरी काही चुका झाल्या. या प्रवासात लक्षात आले की, एक डोंगरमाथा गाठला की त्यावरुन पुढच्या पर्वतांची शिखरे दिसतात आणि ती आमंत्रणासारखी आव्हाने देत असतात. मी काही काळ विश्रांतीसाठी थांबलो आहे. एकदा सभोवतालचा परिसर न्याहाळून घ्यायचा आहे. पण मला येथे काही क्षण थांबणे जमणार आहे कारण स्वातंत्र्यासोबत येणाऱ्या जबाबदाऱ्या मोठ्या आहेत आणि त्या मार्गी लागेपर्यंत मला विश्रांती घेता येणार नाही. वयाच्या 95 वर्षापर्यंत

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

ऐतिहासिक योगदान देणारे असे त्यांचे व्यक्तिमत्व आणि नेतृत्व होते. त्यांच्या निधनामुळे इतिहासातील एका युगाचा अस्त झाला आहे. परंतु जागतिक स्तरावरील वर्णद्वेषाच्या आव्हानांचा आम्ही कसा मुकाबला करणार आहोत, हे आव्हान आपणा सर्वांना पेलायचे आहे एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करते.

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंत डावखरे (उप सभापती ) : माननीय सभापती महोदय, सभागृहाचे नेते व माननीय उप मुख्यमंत्री यांनी मांडलेल्या शोक प्रस्तावाच्या चर्चेमध्ये माझी सहवेदना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

दक्षिण आफ्रिकेचे राष्ट्रपिता, वर्णद्वेष विरोधी लढ्याचा युगपुरुष, विश्वशांतीदूत डॉ. नेल्सन मंडेला यांचे दिनांक 6 डिसेंबर, 2013 रोजी दु:खद निधन झाले.

साऱ्या जगाने ज्याच्याकडे आदराने पहावे असा या शतकाच्या आरंभी जगाला पाहता आलेला आणि गेल्या शतकाची पाऊणशे वर्षे माणुसकीच्या स्वातंत्र्यासाठी लढत आलेला आणखी एक महात्मा काळाने या जगातून हिरावून नेला आहे. महात्मा गांधी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, मार्टिन ल्युथर किंग व डॉ.नेल्सन मंडेला हे अन्याय व वांशिक किंवा वर्णवादी पिळवणुकीच्या विरुध्द धैर्याने उभे ठाकलेल्यांचे प्रतीक समजले जातात.

डॉ.नेल्सन मंडेला व भारत यांचे नाते अतूट होते. महात्मा गांधीना ते आपले दैवत मानत होते. त्यांच्या मते, भारत हा गांधीजींचा जन्मदेश तर दक्षिण आफ्रिका हा अंगीकारलेला देश होता. नेल्सन मंडेलांचा दक्षिण आफ्रिका हा जन्मदेश होता तरी त्यांना भारताविषयी फार प्रेम होते. त्यांचे भारताशी घट्ट नाते होते हे विसरुन चालणार नाही. 1990 साली तुरुंगातून बाहेर पडल्यानंतर ते भारत दौऱ्यावर आले होते आणि पुन्हा राष्ट्रपती झाल्यानंतर त्यांनी भारताचा दौरा केला होता. ही बाबच त्यांच्या भारत प्रेमाची साक्ष देणारी आहे. दक्षिण आफ्रिकेत त्यांनी वर्णभेदाविरुध्द यशस्वी लढा दिल्याबद्दल भारत सरकारने त्यांना 1990 साली "भारतरत्न" हा सर्वोच्च नागरी सन्मान देऊन गौरविले होते.

दैवाचा योगायोग देखील काय आहे पाहा. वर्णभेदाविरुध्द आवाज उठविणारे, अन्याय व शोषणाविरुध्द लढणारे दोन महामानव आणि भारतरत्न यांचे महानिर्वाणसुध्दा 5 आणि 6 डिसेंबर या तारखांना एका पाठोपाठ झाले आहे.

जगण्यावर अपार प्रेम करणारे डॉ.नेल्सन मंडेला गेले काही महिने मरणाच्या वाटेवर होते. तसे पाहिले तर प्रत्येक जीव जन्मक्षणापासून मरणाच्याच वाटेवर असतो म्हणूनच जन्म हा मानवाला ईश्वराने दिलेला मृत्यूचा परवाना आहे असे म्हटले जाते. परंतु जन्म आणि मृत्यू यातील वाट उजळवून टाकण्याचे भाग्य काहींच्याच वाट्याला येते. डॉ.नेल्सन मंडेला यांना हे भाग्य लाभले, त्या भाग्यवंतास विनम्र अभिवादन करतो व माझी भावपूर्ण आदरांजली वाहतो.

-------- यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सदनाचे नेते आणि माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांनी दक्षिण आफ्रिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष नेल्सन मंडेला यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडलेला आहे. त्यांनी मांडलेल्या शोक प्रस्तावावर माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

महोदय, 20 व्या शतकामध्ये जगभरातील समतावादी आंदोलनाचा आदर्श म्हणून नेल्सन मंडेला यांच्याकडे पाहिले जात होते. संपूर्ण देशामध्ये महात्मा गांधीजींनी स्वातंत्र्य लढा चालविला. त्यापूर्वी दक्षिण आफ्रिकेतील जनतेवर अन्याय होत होता. दक्षिण आफ्रिकेत असताना महात्मा गांधीजींनी तेथील जनतेवर प्रशासनाकडून मोठ्या प्रमाणावर होत असलेल्या अन्यायाला वाचा फोडण्याचे काम केले. दक्षिण आफ्रिकेमध्ये गोरा आणि काळा असा भेदभाव केला जात होता. तेथे काळ्या वर्णाच्या लोकांची छळवणूक केली जात होती. देशामध्ये समता निर्माण व्हावी यासाठी नेल्सन मंडेला यांनी 27 वर्षे कारावास भोगला. तेथे त्यांना वेगवेगळया प्रकारची आमिषे सुध्दा दाखविली गेली. आपण हे आंदोलन सोडले तर सत्तेतील वेगवेगळी पदे मिळतील असेही सागितले गेले. असे असताना सुध्दा त्यांनी वर्णभेदाच्या विरोधात लढा देऊन संपूर्ण जगाला दाखवून दिले की, समता हा अत्यंत महत्वाचा विषय आहे. त्यांची हीच इच्छा होती की, जगामध्ये समता असली पाहिजे. त्यासाठी माझे संपूर्ण आयुष्य जेलमध्ये गेले तरी चालेल, अशा प्रकारची भूमिका घेऊन त्यांनी संपूर्ण देशाला एक संदेश दिला. सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले साहेबांनी राष्ट्राध्यक्ष श्री. बराक ओबामा यांच्या संदर्भात त्या बाबतचा उल्लेख केला. अशा प्रकारची उंची गाठलेला एक समाजवादी नेता, देशामध्ये समानता असली पाहिजे असा विचार पुढे घेवून जाणारा आणि संपूर्ण आयुष्य वेचणारा असा नेता या जगामधून निघून गेला, त्याचे तीव्र दु:ख आम्हा सर्वांना झालेले आहे. एवढेच नव्हे तर जगातील या विचारसरणीच्या प्रत्येक व्यक्तीला दु:ख झालेले आहे. खऱ्या अर्थाने भारताने आपला एक मित्र गमावला आहे. एका वेगळया नजरेने संपूर्ण जग त्यांच्याकडे पाहात होते. भारतीय जनतेला असे वाटत होते की, नेल्सन मंडेला हे आमच्यातीलच नेतृत्व करणारे एक नेते आहेत. आपल्या देशाने त्यांना 'भारतरत्न' या पुरस्काराने गौरविले होते. त्यांच्या निधनाने या जगातील फार मोठे नेतृत्व हरपलेले आहे. क्रिकेट खेळणाऱ्या ब-याच राष्ट्रांनी दक्षिण आफ्रिकेवर बंदी घातली





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे....

होती. त्या संदर्भात देखील त्यांनी आंदोलन केले. नेल्सन मंडेला यांच्या वर्णव्यवस्थेच्या लढ्यांबद्दल अनेक उदाहरणे देता येतील. नेल्सन मंडेला यांच्या रुपाने एक महान नेतृत्व, ज्यांनी संपूर्ण जगाला एक वेगळा संदेश दिला, समानतेचा विषय ज्यांनी सातत्याने आंदोलनाच्या माध्यमातून हाताळला अशा प्रकारचे एक आगळे वेगळे नेतृत्व आज काळाच्या पडद्याआड गेले आहे. निश्चितच त्यांनी दिलेला आदर्श जगातील अनेक राष्ट्रात आणि क्षेत्रात पुढे येत असताना आपण पाहत आहोत.

महोदय, पूर्वी अमेरिकेत काळ्या-गोऱ्या वर्णाच्या लोकांच्या दंगली सतत होत होत्या. आज त्या देशाने काळ्या वर्णातील व्यक्तीला राष्ट्राध्यक्ष म्हणून स्वीकारलेले आहे. अशा प्रकारची प्रेरणा व वातावरण जगामध्ये निर्माण होत आहे. भारतामध्ये महात्मा गांधींनी या बाबतची मुहूर्तमेढ रोवून जगाला तशा प्रकारचे विचार दिले. त्याच आधारावर नेल्सन मंडेला यांनी संपूर्ण जगाला वेगळा संदेश देण्याचे काम केले.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे ....

त्यांच्या निधनाने फार मोठी हानी झाली आहे. परंतु, त्यांनी दिलेला संदेश, त्यांनी दिलेली वाट निश्चितपणे स्वीकारून जग पुढे जाईल, अशा अपेक्षा सर्वांना आहेतच. मी प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वतीने आणि माझ्या वतीने डॉ. नेल्सन मंडेला यांना श्रध्दांजली अर्पित करतो.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुमंतराव गायकवाड (नामनियुक्त) : आज या ठिकाणी दक्षिण आफ्रिकेचे नेते डॉ. नेल्सन मंडेला यांना श्रध्दांजली वाहण्यासाठी जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे, त्याला रिपब्लिकन पक्षाच्या वतीने पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. डॉ. नेल्सन मंडेला यांनी आदर्श घातला आहे. भारतामध्ये अस्पृश्यांच्या उध्दारासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चळवळ केली, महात्मा गांधी यांनी अहिंसेचे मार्गाने चळवळ केली, त्या गोष्टींचा आधार घेऊन दक्षिण आफ्रिकेमध्ये डॉ. नेल्सन मंडेला यांनी काळे व गोरे अशा वर्णभेदाबद्दल यशस्वीपणे लढा दिला. त्यांनी कित्येक वर्षे कारावासही सहन केला. शेवटी ते त्या राष्ट्राचे राष्ट्राध्यक्ष झाले. अशा एका महान नेत्याला मी रिपब्लिकन पक्षाच्या वतीने श्रध्दांजली वाहतो. जय भीम !

----

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सभागृहाचे नेते माननीय उप मुख्यमंत्री नामदार श्री. अजितदादा पवार यांनी दक्षिण आफ्रिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष भारतरत्न डॉ. नेल्सन मंडेला यांच्या दु:खद निधनाबद्दलचा शोक प्रस्ताव मांडला आहे, त्यावर सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे व इतर सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

दक्षिण आफ्रिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष भारतरत्न डॉ. नेल्सन मंडेला यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधीजींची प्रेरणा घेऊन दक्षिण आफ्रिकेत अनेक शतकांपासून कृष्णवर्णीयांवर होत असलेल्या अन्यायाला वाचा फोडली. व्यापक संगठन करून मोठा लढा उभारला. या संघर्षात दोषी ठरवून त्यांना 27 वर्षे तुरूंगात टाकले. परंतु, त्यानंतरही ते आपल्या निश्चियापासून ढळले नाहीत. त्यांनी पुन्हा वर्णभेदविरोधी लढा सुरू केला. दक्षिण आफ्रिकेत लोकशाही राजव्यवस्था प्रस्थापित व्हावी आणि त्या सोबतच वर्णभेदाचे समूळ उच्चाटन करून तेथील जनतेला समान न्याय मिळावा, म्हणून त्यांनी चळवळ केली. सत्ता, संपत्ती, प्रथा, जुलूम व अन्याय यांचा विरोध करून त्यांनी लोकशाही शासन आणण्याचा प्रयत्न केला आणि अखेर त्यांच्या प्रयत्नांना यशही मिळाले. दक्षिण आफ्रिकेत अंतरिम राज्यघटना तयार होऊन कृष्णवर्णीयांना मूलभूत हक्क प्राप्त झाले. सन 1994 मध्ये दक्षिण आफ्रिकेत प्रथमच वर्णभेद विरहित सार्वत्रिक निवडणूक झाली. त्यात डॉ. नेल्सन मंडेला यांच्या आफ्रिकन नॅशनल काँग्रेसला प्रचंड बहुमत मिळाले. दिनांक 10 मे, 1994 रोजी डॉ. मंडेला दक्षिण आफ्रिकेचे पहिले कृष्णवर्णीय राष्ट्राध्यक्ष झाले. त्यांनी सन 1994 ते सन 1999 या काळात दक्षिण आफ्रिकेला एक समृध्द देश म्हणून उभे केले. त्यांनी अलिप्त राष्ट्रांच्या चळवळीत सामील होऊन दक्षिण आफ्रिकेला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवण्यात यश मिळविले. त्यानंतर त्यांनी अलिप्त राष्ट्र चळवळीला बळ दिले आणि जागतिक राजकारणात आपला ठसा उमटविला. त्यांनी केलेल्या कार्यामुळे स्वातंत्र्य, लोकशाही, सहिष्णुता, सामाजिक समता, दारिद्र्य निर्मूलन याबाबत संयुक्त कटिबध्दतेचा नवा इतिहास निर्माण झाला आहे. त्यांनी केलेल्या कार्याबद्दल सन 1990 मध्ये त्यांना भारत सरकारने भारत देशातील सर्वोच्च असणारा "भारतरत्न" हा पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला तर सन 1993 मध्ये जागतिक शांततेच्या "नोबेल" पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले. इतकेच नव्हे तर देशभरातील अनेक देशांनी राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय कीर्तिचे अडीचशेहून अधिक पुरस्कार देऊन तर 50

..4

**सभापती** ....

पेक्षा जास्त आंतरराष्ट्रीय विद्यापीठांनी त्यांना मानद पदवी बहाल करून त्यांच्या कार्याचा गौरव केला. मानवी हक्कांच्या लढ्यासाठी आयुष्यभर अहिंसेच्या मार्गाने नवक्रांती घडवून आणणाऱ्या क्रांतिकारी नेत्याचे शुक्रवार, दिनांक 6 डिसेंबर, 2013 रोजी दु:खद निधन झाले.

( नंतर श्री. खंदारे ....

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**......

डॉ.नेल्सन मंडेला यांच्या निधनाने दक्षिण आफ्रिकेतील जनतेने आपला राष्ट्रपिता व जगाने लढवय्या शांतीदूत गमावला आहे. त्यांचे जीवन आणि त्यांच्यातील जिद्द, संयम व त्यांनी जपलेली जीवनमूल्ये आपणा सर्वांना प्रेरणादायी ठरतील. दक्षिण आफ्रिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष, भारतरत्न डॉ.नेल्सन मंडेला यांच्या स्मृतीला मी अभिवादन करतो व भावपूर्ण आदरांजली वाहतो.

सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

( सदस्य उभे राहतात. )

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत शोकाकुल कुटुंबीयाकडे पाठविण्यात येईल.

-----

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

**पृ.शी.**: शोक प्रस्ताव

**मु.शी.**: सर्वश्री जयवंतराव कृष्णराव भोसले, त्र्यंबक मुकुंदराव कांबळे माजी वि.प.स.यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव

श्री.अजित पवार ( उप मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, मी सर्वश्री जयवंतराव कृष्णराव भोसले, त्र्यंबक मुकुंदराव कांबळे, माजी विधानपरिषद सदस्य यांच्या निधनाबद्दल मी खालील शोक प्रस्ताव मांडतो.

" सर्वश्री जयवंतराव कृष्णराव भोसले, त्र्यंबक मुकुंदराव कांबळे, माजी विधानपरिषद सदस्य यांच्या निधनाबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करते."

कै. जयवंतराव कृष्णराव भोसले यांचा जन्म 22 डिसेंबर, 1924 रोजी सातारा जिल्ह्यात कराड तालुक्यातील रेठरे (बु||.) येथे झाला. त्यांचे शिक्षण बी.ए.,एलएल.बी. पर्यंत झाले होते.

कै. भोसले यांनी शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक-अध्यक्ष, कृष्णा चॅरिटेबल ट्रस्ट व कृष्णा उद्योग समुहाचे शिल्पकार, कृष्णा सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक तर सतत 30 वर्षे चेअरमन, मयुर कुक्कुटपालन सहकारी संस्था, कृष्णा सहकारी कृषी उद्योग संघ, कृष्णा सहकारी बँकेचे संस्थापक, महाराष्ट्र राज्य साखर संघाचे अध्यक्ष, सहयाद्री सहकारी मुद्रण संस्था, मुंबई, डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्टस् असोसिएशन, पुणे, महाराष्ट्र पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळाचे संचालक, इंटरनॅशनल सोसायटी ऑफ शुगरकेन टेक्नॉलॉजिस्टस व शुगर टेक्नॉलॉजिस्टस् असोसिएशन ऑफ इंडिया, कानपूर तसेच भारतीय औद्योगिक वित्तीय महामंडळ, नवी दिल्ली या संस्थांच्या सल्लागार मंडळाचे सदस्य म्हणूनही कार्य केले होते. कराड तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी फार मोठे योगदान त्यांनी दिले होते. सातारा व सांगली जिल्ह्यातील अनेक सामाजिक, शैक्षणिक व सहकारी संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता. त्यांनी केलेल्या सामाजिक कार्यासाठी त्यांना सन 2000 मध्ये "प्रियदर्शनी इंदिरा गांधी पुरस्कार," "प्रितिसंगम पुरस्कार" तर 2006 मध्ये विजय दिवस समारोह समितीतर्फे "जीवन गौरव यशवंत पुरस्कार," देऊन त्यांचा गौरव केला होता.

कै. भोसले 1980 मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर राज्यपालाद्वारा नामनियुक्त सदस्य म्हणून निर्वाचित झाले होते.

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

श्री.अजित पवार.....

अशा या अभ्यासू, कार्यक्षम तसेच शैक्षणिक, सामाजिक, राजकीय व सहकारी क्षेत्रातील अध्वर्यू, कृष्णा उद्योग समुहाचे शिल्पकार, सहकार चळवळीतील जेष्ठ समाज सेवकाचे सोमवार, दिनांक 5 ऑगस्ट, 2013 रोजी दु:खद निधन झाले.

कै. त्र्यंबक मुकुंदराव कांबळे यांचा जन्म 9 जुलै, 1954 रोजी लातूर जिल्ह्यात निलंगा तालुक्यातील झरी येथे झाला. त्यांचे शिक्षण एम.ए.पर्यंत झाले होते.

कै. कांबळे यांनी नागसेन शिक्षण प्रसारक मंडळ, दलित साहित्य संघ, यशोधरा महिला मंडळाचे संस्थापक, महात्मा फुले नागरी सहकारी संस्थेचे चेअरमन, डॉ.बाबासाहेब आंबेडकर लोकशिक्षण मंडळ, लातूरचे अध्यक्ष, तसेच बुध्दीस्ट कल्चरल ट्रस्ट, लातूर व क्रांती कल्चरल अकॅडमी पुणेचे संचालक म्हणूनही कार्य केले होते.

कै. कांबळे यांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे जनरल सेक्रेटरी, दलित पँथरचे संस्थापक-सदस्य तसेच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (डेमोक्रेटीक)चे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष म्हणूनही कार्य केले होते.

नंतर श्री.शिगम.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार....

कै. कांबळे यांनी मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर आंदोलन तसेच मंडल आयोग समर्थनार्थ आंदोलनाचे नेतृत्व केले होते. त्यात त्यांना कारावासही झाला होता. त्यांनी गायरान जमिनी तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती वाढीसाठी संघर्ष केला होता. एक लढवय्या नेता अशीच त्यांची सर्वत्र ओळख होती.

कै. कांबळे १९९० मध्ये राज्यपालांद्वारा महाराष्ट्र विधानपरिषदेवर नामनियुक्त सदस्य म्हणून निर्वाचित झाले होते.

अशा या उमद्या व लढवय्या नेत्याचे शनिवार, दिनांक २८ सप्टेंबर, २०१३ रोजी दु:खद निधन झाले.

मी कै.जयंतराव भोसले व कै. त्र्यंबक कांबळे या दोन्ही दिवंगत माजी सदस्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

----

..२..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय श्री.अजितदादा पवार यांनी श्री. जयवतंराव कृष्णराव भोसले व श्री. त्र्यंबक मुकुंदराव कांबळे यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोकप्रस्ताव मांडलेला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

श्री. जयंतराव भोसले यांना अप्पासाहेब म्हणून संबोधले जात होते. कृष्णाकाठच्या परिसरामध्ये त्यांनी मोठे कार्य उभे केलेले आहे. रेठरे बुद्रुक सारख्या लहान गावामध्ये त्यांचे बालपण गेले. उच्च शिक्षण घेतल्या नंतर एक नामवंत वकील म्हणून ते ओळखले जाऊ लागले. त्याच वेळी त्यांनी विविध संस्थांच्या माध्यमातून सामाजिक क्षेत्रात कार्यरत राहाणे पसंत केले. त्यांनी रेठरे बुद्रुक सारख्या गावामध्ये अनेक प्रकल्प उभे केले. या प्रकल्पांचा उल्लेख सभागृहाच्या नेत्यांनी त्यांच्या भाषणामध्ये केलेला आहे. कृष्णा सहकारी साखर कारखाना, कृषी उद्योग संघ, कृष्णा सहकारी बँक, सहकारी मुद्रण संस्था, कृष्णा महाविद्यालय, कृष्णा हॉस्पिटल या सारख्या संस्था त्यांनी उभ्या केल्या. समाजातील सर्वसामान्य माणसाना लाभ मिळावा या हेतूने त्यांनी या संस्था उभ्या केल्या आणि त्या पुढे कार्यरत ठेवल्या. माननीय यशवंतराव चव्हाण यांनी ज्या उद्देशाने सहकार चळवळ या राज्यामध्ये सुरु केली ती चळवळ सर्वसामान्य माणसासाठी रुजविण्याचे काम अप्पासाहेबांनी केले. कृष्णा सहकारी साखर कारखान्याच्या वतीने त्यांनी लिफ्ट इरिगेशनचे 17 प्रोजेक्ट सुरु केले आणि 72 हजार हेक्टर जमीन ओलिताखाली आणली. कृष्णा वैद्यकीय महाविद्यालय हे देशपातळीवर नावाजलेले महाविद्यालय आहे. या महाविद्यालयाला डीम युनिव्हर्सिटी म्हणून मान्यता मिळाली. या डीम युनिव्हर्सिटीचे ते कुलपती होते. राजकीय मतभेदाच्या पलीकडे जाऊन, सामाजिकतेचे भान ठेवून, सर्वसामान्य माणसाला केंद्रबिंदू मानून त्यांनी सातत्याने कार्य केले आणि त्यामुळेच त्यांना प्रियदर्शनी इंदिरा गांधी पुरस्कार, प्रीतिसंगम पुरस्कार, जीवन गौरव यशवंत पुरस्कार या सारख्या पुरस्कारांनी गौरविण्यात आले. ते नेहमी असे म्हणत की, माणसाला जीवनामध्ये समाधान हवे असेल तर त्याने नेहमी दुस-याला मदत करीत राहिले पाहिजे. असे अगदी साधे तत्व अंगीकारुन त्यांनी अनेक लोकांचे जीवन फुलविण्याचे काम केले. अशा जयवंतराव भोसले यांना मी श्रध्दांजली अर्पण करतो.

..3..



श्री. विनोद तावडे....

तसेच आपणा सर्वांना परिचित असणारे आंबेडकरी चळवळीचे शिलेदार, उपेक्षित आणि वंचितांच्या प्रश्नावर संघर्ष करणारे, नामांतर चळवळीचे लढवय्ये नेते, अन्याय, अत्याचाराविरुध्द सातत्याने आक्रमक झंझावात निर्माण करणारे श्री. टी.एम.कांबळे हे मराठवाड्यातील लातूरचे. ते रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष होते. जेव्हा महाराष्ट्रामध्ये दलित पँथरची एक आक्रमक चळवळ सुरु झाली त्यावळी श्री. टी.एम.कांबळे हे त्या चळवळीच्या संस्थापक सदस्यांपैकी एक होते आणि म्हणून त्यांचा सर्वांना परिचय होता. त्यांचे आईवडील हमाली करुन कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होते. अशा गरीब कुटुंबामध्ये जन्माला येऊन त्यांनी एम.ए.पर्यंत शिक्षण घेतले. घरची गरिबीची परिस्थिती असताना देखील नोकरी सोडून त्यांनी स्वत:ला आंबेडकरी चळवळीमध्ये झोकून दिले. या चळवळीच्या माध्यमातून त्यांनी महाराष्ट्रातच नव्हे तर महाराष्ट्राच्या बाहेर देखील चांगले काम केले. या आंबेडकरी चळवळीमध्ये ते विद्यार्थी जीवनापासूनच सक्रिय होते आणि त्यांची ही सक्रियता त्यांना राजकीय जीवनामध्ये खूप उपयुक्त ठरली. ते विधानपरिषदेचे सदस्य म्हणून नामनियुक्त झाल्यानंतर त्यांनी सातत्याने दलित समाजाचे विषय मांडले. दलित समाजाच्या न्याय्य मागण्यांसाठी त्यांनी रस्त्यावर संघर्ष केला. तसेच ते विषय सभागृहाच्या माध्यमातून सोडविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. आंबेडकरी चळवळीचा एक लढवय्या नेता म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. अशा लढवय्या नेत्याचे दु:खद  निधन झालेले आहे. त्यांना मी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

----

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभागृहाचे नेते आणि उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी दिवंगत माजी विधानपरिषद सदस्य जयवंतराव कृष्णराव भोसले, त्र्यंबक मुकुंदराव कांबळे यांना श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी शोक प्रस्ताव मांडला आहे, त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभी आहे.

सहकार चळवळीत पायाभूत काम करणारे व्यक्तिमत्व आणि संपूर्णपणे कृष्णा उद्योग समूह, हॉस्पिटल्स, सहकारी बँका अशा विविध संघटनांचा आधारभूत पाया कराड तालुक्यात आणि पश्चिम महाराष्ट्रात समृध्द करण्याचे काम जयवंतराव भोसले यांनी केले आहे.साधारणपण 70 ते 90 या कालावधीमध्ये कृषी, उद्योग आणि सहकार यांना एकत्रितपणे बरोबर घेऊन नवीन महाराष्ट्र घडविण्यासाठी ज्या एका पिढीने स्वत:चे योगदान केले, त्यांच्यामधील एक महत्वाचे व्यक्तिमत्व म्हणून जयवंतराव भोसले यांचा समावेश करावा लागेल. त्यांनी दीर्घकाळ योगदान दिले आहे. त्याचाच एक भाग म्हणून केवळ कराड तालुक्यापुरते त्यांचे कार्य मर्यादित न राहता, भारतीय स्तरावरील तसेच राज्य स्तरावरील विविध स्तरावरील समित्यांमध्ये त्यांना काम करण्याची संधी मिळाली. त्यांना "प्रियदर्शनी इंदिरा गांधी पुरस्कार" तसेच "प्रितीसंगम" पुरस्कार आणि 2006 मध्ये "जीवन गौरव यशवंत पुरस्कार" मिळाले आहेत. अशा व्यक्तिमत्वाच्या नेत्याला कै.यशवंतराव चव्हाण, स्व.इंदिरा गांधी यांच्या नावाचे पुरस्कार दिले गेले आहेत. त्यांनी प्रत्येक क्षेत्रात किती चांगली कामे केलेली आहेत ही गोष्ट या पुरस्कारावरुन निश्चितपणे सिध्द होते. मी अशा थोर व्यक्तिमत्वाला शिवसेना पक्षाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करते.

विधान परिषदेचे दुसरे दिवंगत सदस्य त्र्यंबक मुकुंदराव कांबळे यांना आपण सर्व टी.एम.कांबळे नावाने ओळखतो. त्यांच्या बरोबर माझा परिचय 1980 पासूनचा होता. नवयुवक चळवळ ही 1970 पासून महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण जगामध्ये उदयाला आली. ज्यांनी प्रस्थापित नेतृत्वाच्या पलीकडे जाऊन एक वेगळी शैली, वेगळया प्रकारची कार्यपध्दती, एक वेगळया प्रकारचा विचार सुरु करुन विविध प्रस्थापिताचे नेतृत्व मुळापासून उखडून टाकावे अशी स्वप्न असणारी पिढी होती, त्या पिढीचा साकल्याने विचार करुन दलित पँथरच्या कामातून सुरुवात करणारे टी.एम.कांबळे हे नवयुवक नेते होते. लातूर व मराठवाडयातील इतर काही

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे..

भागात त्या काळात जातीयता मोठ्या प्रमाणात होती. आज त्याचे स्वरुप थोडे बदलले असले तरी त्या काळात जातीयतेतील काही उदाहरणे मला आठवतात. पायात चपला घातल्या म्हणून त्याच्या कुटुंबीयावर बहिष्कार घातला जावयाचा, गावातील पाणी पुरवठा येथून पाणी नेण्यास बहिष्कार घालण्यात येत होता. असे प्रकार बंद व्हावेत म्हणून राज्यात गावा-गावांमध्ये आंदोलने उभे राहिली होती. त्या आंदोलनात दलित पँथरची अतिशय महत्वाची भूमिका होती. त्या नंतर त्यांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पार्टीतील श्री. रामदास आठवले यांच्या बरोबर काम केले. विशेषत: मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराच्या बाबतीत आंदोलने झाली त्यावेळी लातूर, बीड, सोलापूर येथे यासंसंधीचे कार्यक्रम असावयाचे. या कार्यक्रमांमध्ये टी.एम.कांबळे यांचा महत्वाचा सहभाग असावयाचा. ते विचाराने आक्रमक असले तरी त्यांचे व्यक्तिमत्व सौम्य आणि शांत स्वरुपाचे होते. समोरच्या व्यक्तीशी बोलत असताना, वागत असताना समोरच्या व्यक्तीच्या भावना लक्षात घेऊन ते राजकारणातील प्रत्येकाशी सुसंवाद ठेवावयाचे.

गेल्या काही वर्षापासून ते आजाराने त्रासलेले होते. शेवटच्या काळामध्ये त्यांच्या कुटुंबीयांनी त्यांना उपचारासाठी परदेशातही नेले होते, त्यांच्या कुटुंबीयांनी त्यांच्यावर उपचार करण्यासाठी भरपूर प्रयत्न केले. परदेशात उपचारासाठी दाखल केले असताना त्यांना अनेक सहकाऱ्यांनी मदत केली. परंतु त्यांची किडनी फेल्यूअर झाल्याने अतिशय अल्प वयात म्हणजे वयाच्या 60 व्या वर्षी आपल्यातून ते हिरावले गेले. मराठवाडयात समतेची चळवळ मजबूत करणारे ते एक शिलेदार होते. त्यांनी विधानपरिषदेत सुध्दा चांगल्या प्रकारे काम केले आहे असे आमचे अतिशय जवळचे सहकारी कायमचे आमच्यापासून दूर गेलेले आहेत.

यानंतर श्री.भोगले

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.....

त्यांची जी विचारधारा होती ती पाहता प्रघात म्हणून वेगवेगळ्या ठिकाणी श्रध्दांजली व्यक्त केली जाते. परंतु मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे जे प्रश्न आहेत, त्या प्रश्नांना खऱ्या अर्थाने न्याय देणे त्याचबरोबर महार वतन जमिनीच्या संदर्भातील समित्यांच्या अहवालाच्या अनुषंगाने जे जे प्रश्न प्रलंबित आहेत ते सोडवून त्यांना न्याय देऊ शकलो तर तीच खरी टी.एम.कांबळे यांना श्रध्दांजली वाहिली जाईल असे मला वाटते.

---------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते आदरणीय उप मुख्यमंत्री यांनी सर्वश्री जयवंतराव कृष्णराव भोसले, त्र्यंबक मुकुंदराव कांबळे यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोकप्रस्ताव मांडला आहे त्या प्रस्तावाला पाठिंबा देण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये साखर उद्योगाच्या माध्यमातून ज्या दोघा बंधुंनी खऱ्या अर्थाने क्रांती घडविली त्यापैकी यशवंतराव मोहिते हे वैधानिक विधिमंडळामध्ये काम करीत होते आणि जयवंतराव भोसले हे वेगवेगळ्या संस्थांमध्ये काम करीत होते. ग्रामीण भागामध्ये साखर उद्योगाच्या माध्यमातून कष्टकरी, शेतकऱ्यांची मुले शिकली पाहिजेत म्हणून वेगवेगळ्या शैक्षणिक संस्था सुरु केल्या आणि त्या दृष्टीने पूरक उद्योग काढण्याचे काम यशवंतराव मोहिते यांच्या नेतृत्वाखाली जयवंतराव भोसले यांनी केले. त्यामध्ये कुक्कुटपालन व्यवसाय, शैक्षणिक संस्था, दूध संघ यांचा समावेश होतो. हे पूरक उद्योग काढण्याचे काम यशवंतराव मोहिते यांच्या विचाराने झालेले आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्राच्या पुरोगामी विचाराचे केंद्रबिंदू असलेले रेठरे बुद्रूक हे गाव यशवंतराव मोहिते आणि जयवंतराव भोसले या दोघा बंधुंनी नावारुपास आणले. ग्रामीण भागात पहिल्यांदा मेडिकल कॉलेज सुरु करण्याचे काम साखर उद्योगाच्या माध्यमातून यशवंतराव मोहिते यांच्या नेतृत्वाखाली जयवंतराव भोसले यांनी केले. त्यानंतर इतर शैक्षणिक संस्था स्थापन करण्यात आल्या. त्या अनुषंगाने टीका झाली. परंतु त्यावेळी यशवंतराव मोहिते यांनी सांगितले होते की, कायद्याच्या चाकोरीबाहेर जाऊन एखादी संस्था उभी रहात असेल तर ती उभी करावी लागेल. तरच ग्रामीण भागातील मुले शिकू शकतील. त्यांच्या उद्योग समुहाचा वेगळा कॅम्प होता. मी अनेकदा कॅम्पमध्ये गेलो आहे. जयवंतराव भोसले म्हणजे एक उत्कृष्ट प्रशासक होते. सहकार क्षेत्रामध्ये त्यांचे नाव आदराने घेतले जाते. मी त्यांच्या निधनाबद्दल माझ्या पक्षाच्या वतीने श्रध्दांजली वाहतो.

सभापती महोदय, टी.एम.कांबळे हे पुरोगामी विचाराचे होते. रिपब्लिकन पक्षाचे सर्व गट एकत्र येण्यासाठी धडपडणारे कार्यकर्ते होते. त्यांनी वेगवेगळे लढे दिले. मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराचा प्रश्न असो किंवा मंडल आयोगाच्या चळवळीमध्ये प्रामुख्याने

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.....

अग्रणी असलेल्या महाराष्ट्राच्या या नेत्यांबरोबर काम करण्याची मला संधी लाभली. अनेकदा त्यांनी संघर्षमय वृत्तीने काम केले. आयुष्याच्या शेवटच्या क्षणी तरुण वयामध्ये त्यांना किडनीच्या विकाराने ग्रासले. त्यातच त्यांचे निधन झाले. मी त्यांना माझ्या पक्षाच्या वतीने श्रध्दांजली वाहतो.

-----------

..4...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, महाराष्ट्रात समाजवादाचा पाळणा सहकाराच्या माध्यमातून हलेल असे स्वप्न यशवंतरावांनी पाहिले होते. रेठरे बुद्रूकचे यशवंतराव मोहिते हे तर कट्टर मार्क्सवादी. पण समाजवादाचा पाळणा कृष्णा खोरे परिसरात जर कोणी हलविला असेल तर तो त्यांचेच बंधू जयवंतराव भोसले यांनी. सहकाराच्या माध्यमातून त्यांनी कुक्कुट पालनापासून मेडिकल कॉलेजपर्यंत असंख्य प्रयोग केले. असंख्य शाळा सुरु केल्या. त्या परिसरातील माणसांचे जीवन बदलण्याचे काम जयवंतराव भोसले यांनी केले.

सभापती महोदय, जयवंतराव भोसले हे एकदा कृष्णा मेडिकल कॉलेजचा परिसर पहायला आम्हाला घेऊन गेले होते. तो संपूर्ण परिसर त्यांनी आम्हाला दाखविला. महाराष्ट्रामध्ये सहकाराच्या माध्यमातून जी काँग्रेस रुजली होती त्याचे मुख्य कारण म्हणजे जयवंतराव भोसले यांच्या सारख्या अनेक कार्यकर्त्यांनी स्वत:ला गाडून काम करुन घेतले. म्हणून त्या भागात काँग्रेस रुजू शकली, वाढू शकली हे आपण मानले पाहिजे. म्हणून जयवंतराव भोसले यांना मी विनम्र श्रध्दांजली वाहतो.

नंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील...

सभापती महोदय, श्री.टी.एम.कांबळे हे दलित पँथरचे खरे वाघ होते. मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराचा लढा असेल, महार वतनाच्या जमिनीचा प्रश्न असेल किंवा मंडल आयोगाची चळवळ असेल, या प्रत्येक चळवळीत त्यांच्या सोबत काम करण्याचा अनुभव मला मिळाला होता. श्री.टी.एम.कांबळे अत्यंत सहृदयाचे होते. हा चळवळीमध्ये लढणारा आक्रमक वाघ होता. दुसऱ्या बाजूने व्यक्तिगत जीवनामध्ये अत्यंत प्रेमळ असा माणूस मी त्यांच्यामध्ये पाहिला होता.

एकदा काही पत्रकार मंडळी आदरणीय श्री.विलासराव देशमुख यांच्या सोबत लातूरला गेली होती. त्यावेळी श्री.टी.एम.कांबळे यांचा फोन आला की, कपिल तू माझ्या घरी जेवायला ये. मी साहेबांना म्हणालो, साहेब, मला टी.एम.यांच्याकडे जेवायला जायचे आहे. ते एका मिनिटात म्हणाले की, तू जा तेथे. मी साहेबांचे जेवण सोडून टी.एम.कडे गेलो. त्यांच्या छोट्या घरामध्ये त्यांनी मटण केले होते. त्यांनी मला प्रेमाने वाढले. त्यांना असे वाटले की, कपिल, श्री.विलासराव देशमुख यांच्या बरोबर असल्याने आता काही येणार नाही. तेव्हा मी त्यांना म्हटले की, आपण चळवळीतील कार्यकर्ते आहात. मित्र आहात आणि श्री.विलासराव देशमुख यांना देखील माहिती आहे की, चळवळीतील माणूस मैत्री जपणारा असतो. श्री.विलासराव देशमुख यांनी श्री.टी.एम.कांबळे यांना प्रत्येक चळवळीमध्ये मदत केली आहे. मी श्री.टी.एम.कांबळे यांना देखील विनम्र अभिवादन करतो.

......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी सर्वश्री जयंवतराव भोसले, त्र्यंबक कांबळे, माजी वि.प.स.यांच्या दुःखद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

श्री.जयवंतराव भोसले हे सातारा जिल्ह्यातील कराड येथील. ते अत्यंत अभ्यासू होते. कार्यक्षम, शैक्षणिक, सामाजिक, सहकारी अशा असंख्य संस्थांशी त्यांचा संबंध होता. ते व्यक्ती नसून संस्था होते. श्री.जयवंतराव भोसले हे 1980 मध्ये महाराष्ट्र विधान परिषदेवर राज्यपालांद्वारे नामनियुक्त सदस्य म्हणून निर्वाचित झाले होते. मी माझ्या पक्षाच्या वतीने त्यांना आदरांजली वाहतो.

श्री.टी.एम.कांबळे हे आमचे जवळचे मित्र. आंबेडकरवादी चळवळीतील, दलित चळवळीतील एक प्रमुख नेता आज हरवलेला आहे. ते व्यक्ती नसून संस्था होते. धडपडे होते. प्रत्येक ठिकाणी भांडून गोष्ट मिळवत होते. श्री.कांबळे 1990 मध्ये राज्यपालांद्वारा महाराष्ट्र विधान परिषदेवर नामनियुक्त सदस्य म्हणून निर्वाचित झाले होते. मी त्यांना देखील आमच्या पक्षाच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

......

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुमंत गायकवाड (नामनियुक्त) : सभापती महोदय, माजी सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव भोसले व आमचे मित्र श्री.टी.एम.कांबळे यांच्या दुःखद निधनाबद्दल सभागृहाचे नेते माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी जो शोक प्रस्ताव मांडला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

श्री.जयवंतराव भोसले हे आमच्या साताऱ्या जिल्ह्यातील. सहकारातून प्रगती होते हा नारा श्री.यशवंतराव चव्हाण यांनी दिला. तो आदर्श डोळ्या समोर ठेवून संपूर्ण परिसरामध्ये श्री.जयवंतराव भोसले यांनी प्रगती केली. त्यांनी कुक्कुटपालनाचा मार्ग शेतकऱ्यांना दाखवला. इतकेच नव्हे तर ग्रामीण भागातील मुलांसाठी वैद्यकीय कॉलेज उघडले. हे अत्यंत अवघड काम होते. श्री.जयवंतराव भोसले हे पुरोगामी विचारसरणीचे होते. ते आज आपल्यातून गेले आहेत. त्यांच्या दुःखद निधनाबद्दल मी रिपब्लिकन पक्षाच्या वतीने श्रद्धांजली वाहतो.

त्याच बरोबर भारतीय दलित पँथरचे नेते आणि रिपब्लिकन पक्षाशी ऐक्य झाल्यानंतर, रिपब्लिकन पक्षामध्ये आलेले आमचे मित्र व नेते श्री.टी.एम.कांबळे यांना श्रद्धांजली वाहताना मला अतीव दुःख होत आहे. एक जवळचा मित्र आमच्यातून गेला. नामांतराच्या लढ्यामध्ये अत्यंत अग्रेसर राहून श्री.रामदासजी आठवले यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी लढा दिला. जे नामांतर घडले त्याचे खरे शिल्पकार श्री.टी.एम.कांबळे होते. रिपब्लिकन पक्षामध्ये आल्यानंतर, ऐक्य झाल्यानंतर त्यांनी पक्षाचे सरचिटणीस म्हणून काम केले. त्याला देखील तोड नाही. विद्यार्थी दशेमध्ये असताना त्यांनी रिपब्लिकन पक्षाच्या चळवळीसाठी, मागासवर्गीयांचे उत्थापन करण्यासाठी जे जे कार्य केले ते आपल्याला खरोखरच पुढे न्यावयाचे आहे. एवढे बोलून मी रिपब्लिकन पार्टीच्या वतीने त्यांना श्रद्धांजली वाहतो आणि येथेच थांबतो.

यानंतर श्री.जुन्नरे.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम (वने मंत्री ) : सभापती महोदय, या सभागृहाचे नेते माननीय श्री. अजित पवार यांनी सर्वश्री जयवंतराव कृष्णराव भोसले, त्र्यंबक मुकुंदराव कांबळे यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. जयवंतराव भोसले हे कै.यशवंतराव मोहिते साहेबांचे सख्खे बंधू होते. जयवंतराव दत्तक गेल्यामुळेच त्यांचे नाव जयवंतराव भोसले झाले होते. 1957 मध्ये कृष्णा सहकारी साखर कारखाना काढण्याचे या मंडळींनी ठरवले होते. जयवंतराव भोसले व यशवंतराव मोहिते या बंधुंनी अतिशय परिश्रमाने कृष्णा सहकारी साखर कारखाना काढला होता. 1960 मध्ये यशवंतराव मोहिते व अनंतराव चव्हाण ही मंडळी काँग्रेस पक्षात दाखल झाल्यानंतर मोहिते साहेबांनी जयवंतराव भोसले यांना कृष्णा सहकारी कारखान्याचे चेअरमन केले. 25-30 वर्षे त्यांनी अतिशय समर्थपणे कृष्णा सहकारी साखर कारखाना चालवण्याचे काम केले होते. साखर कारखान्याचे काम करीत असतांना त्यांनी निरनिराळया संस्था उभ्या केल्या, मेडिकल कॉलेज काढले. त्यानंतर ते राज्य सहकारी संघाचे अध्यक्षही झाले. अशा प्रकारच्या सहकार क्षेत्रातील एका सक्षम नेत्याचे दुःखद निधन झालेले आहे.

यशवंतराव मोहिते आणि जयवंतराव भोसले हे कृष्णा काठचे दोन खिल्लारी खोंड आहेत अशी कै.यशवंतराव चव्हाणांनी त्यांना उपमा दिली होती. सहकार क्षेत्रातील जबर अभ्यास असलेल्या नेत्याचे दु:खद निधन झाल्यामुळे मी माझ्या वतीने तसेच पक्षाच्या वतीने त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो.

-----------

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, या सभागृहाचे नेते माननीय श्री. अजित पवार यांनी सर्वश्री जयवंतराव कृष्णराव भोसले, त्र्यंबक मुकुंदराव कांबळे यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

कै. जयवंतराव कृष्णराव भोसले हे पश्चिम महाराष्ट्रातील एक ज्येष्ठ नेते तसेच सहकार महर्षी म्हणून ओळखले जात होते. त्यांनी ग्रामीण भागातील गोरगरीब शेतकऱ्यांच्या लेकराला शिक्षण मिळावे यासाठी शेतकरी शिक्षण मंडळाची स्थापना केली होती. कृष्णा सहकारी साखर कारखान्याची मुहूर्तमेढ रोवण्याचेही काम त्यांनी केले होते. कृष्णा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन म्हणून त्यांनी जवळपास 30 वर्षे समर्थपणे धुरा वाहण्याचे कामही केले होते. कराड तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी अतोनात प्रयत्न केले होते. त्यांनी कराड तालुक्यासाठी फार मोठे योगदान दिले होते.

सातारा जिल्यातील शैक्षणिक, सामाजिक संस्थेच्या संदर्भात त्यांचा अतिशय निकटचा संबंध होता. प्रियदर्शनी इंदिरा गांधी पुरस्कार, प्रीतिसंगम पुरस्कार, जीवन गौरव यशवंत पुरस्कार देऊन त्यांना गौरवण्यात आले होते. अशा या थोर नेत्याला आपण मुकलेलो असल्यामुळे मराठवाडयातील तमाम शिक्षक कर्मचाऱ्यांच्या वतीने,माझ्या पक्षाच्या वतीने, राष्ट्रवादी शिक्षक संघाच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, स्व. त्र्यंबक मुकुंदराव कांबळे यांना सर्व जनता टी.एम.कांबळे या नावाने ओळखत होती. स्व. त्र्यंबकराव मुकुंदराव कांबळे यांचे जन्मगाव माझ्या जिल्हयातीलच होते. दलित पँथरचे आघाडीचे नेते म्हणूनही त्यांना ओळखले जात होते. त्यांनी शेवटपर्यंत आपल्या तत्वाला कधी बाधा येऊ दिली नाही, एवढेच नाही तर त्यांनी शेवटपर्यंत पक्ष बदलही केला नव्हता. त्यांनी गोरगरीब जनतेच्या प्रश्नासाठी सातत्याने लढण्याचे काम केले होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराच्या चळवळीत आघाडीची भूमिका त्यांनी घेतली होती. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळण्याचे तसेच गोरगरीब जनतेवर, दलितांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्याचेही काम त्यांनी केले होते.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे...

दिनांक 28 सप्टेंबर, 2013 रोजी टी.एम.कांबळे यांचे दु:खद निधन झाले. परंतु त्याच्या आठ दिवस अगोदर मी त्यांना सदिच्छा भेट देण्यासाठी आणि त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी त्यांच्याकडे गेलो होतो. त्यांनी माझ्या बरोबर एक तास राजकीय चर्चा केली. त्यांचे इतक्या लवकर निधन होईल असे मला वाटले नव्हते. परंतु येणे आणि जाणे आपल्या हाती नसते. अशा या लढवय्या नेत्याला मराठवाडा आणि महाराष्ट्र मुकला आहे. टी.एम.कांबळे यांना मी माझ्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने व शिक्षक संघाच्यावतीने भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करुन माझे भाषण पूर्ण करतो.

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, या सदनाचे नेते आणि माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी सर्वश्री जयवंतराव कृष्णराव भोसले व त्र्यंबक मुकुंदराव कांबळे या माजी विधानपरिषद सदस्यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी आणि त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

कै.जयवंतराव भोसले यांनी सहकार क्षेत्राच्या माध्यमातून साखर कारखानदारीमध्ये भरीव काम केले. त्यांनी सहकाराच्या माध्यमातून वेगवेगळे उपक्रम राबविले. कै.जयवंतराव भोसले यांच्यापासून आदर्श घेऊन महाराष्ट्रामध्ये सहकार चळवळ मोठ्या प्रमाणावर उभी राहिली.

कै.यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून आणि त्यांनी घालून दिलेल्या मार्गदर्शनाप्रमाणे श्री.जयवंतराव भोसले यांनी सहकार क्षेत्रामध्ये 30-40 वर्षे महत्वाची जबाबदारी सांभाळून सहकार क्षेत्रात एक चांगला आदर्श निर्माण केला.

कै.जयवंतराव भोसले यांनी विधानपरिषद सभागृहात सहकार विषयावर केलेली भाषणे अतिशय चांगली झाली आहेत. श्री.जयवंतराव भोसले यांनी सभागृहाच्या माध्यमातून किंवा इतर वेगवेगळ्या माध्यमातून सहकाराला बळकटी देण्याचा प्रयत्न केलेला आहे. अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे दिनांक 5 ऑगस्ट, 2013 रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या दु:खद निधनामुळे या सदनातील सर्व सन्माननीय सदस्यांना आणि सहकार क्षेत्रातील कार्यकर्त्यांना निश्चितपणे दु:ख झालेले आहे.

श्री.टी.एम.कांबळे यांचे सर्वांशी सलोख्याचे संबंध होते. आपल्या क्षेत्रामध्ये काहीतरी करुन दाखवावे असे त्यांना सारखे वाटत होते. आंबेडकरी चळवळीला चांगली बळकटी देण्यासाठी आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार सर्व समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. एक धडाडीचे तरुण नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात होते. मराठवाड्यामध्ये आंबेडकरी चळवळीला वाहून नेणारे अग्रगण्य नेते म्हणून त्यांचा भविष्यकाळामध्ये उल्लेख करावा लागेल. त्यांना आणखी कर्तबगारी दाखविण्याची संधी असताना त्यांना काळाने आपल्यातून ओढून नेले याचे प्रचंड दु:ख येथे बसलेल्या प्रत्येक सन्माननीय

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सदस्यांना आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी त्यांच्याबद्दल बोलताना सांगितले की, सर्वच पक्षातील सदस्यांशी त्यांचे मित्रत्वाचे संबंध होते. त्यांची शैली आक्रमक असली तरी ते सर्वांशी अत्यंत मृदू व प्रेमाने वागायचे. आंबेडकर चळवळीतील एक चांगला कार्यकर्ता असे सर्वांचे त्यांच्याबद्दलचे मत होते. असे हे तरुण व धडाडीचे नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेले त्याचे दु:ख तुम्हा आम्हा सर्वांना आहे.

जयवंतराव भोसले व त्र्यंबक मुकुंदराव कांबळे या दोन्ही माजी विधानपरिषद सदस्यांच्या दु:खद निधनाबद्दल काँग्रेस पक्षाच्या वतीने मी त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करुन माझे भाषण पूर्ण करतो.

---------

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.जयदेव गायकवाड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सभागृहाचे आदरणीय नेते नामदार श्री.अजितदादा पवार यांनी सर्वश्री जयवंतराव भोसले व त्र्यंबक कांबळे, माजी विधानपरिषद सदस्य यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडलेला आहे. त्या प्रस्तावाला पाठिंबा देऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने मी माझ्या संवेदना व्यक्त करीत आहे.

महोदय, कै.जयवंतराव कृष्णराव भोसले यांच्या प्रदीर्घ सामाजिक व राजकीय प्रवासाकडे तसेच त्यांच्या कर्तृत्वाकडे पाहिल्यानंतर असे लक्षात येते की, या व्यक्तीने समाजाच्या विविध क्षेत्रात किती तरी महनीय कामगिरी केलेली आहे. तसेच त्यांनी शैक्षणिक कार्यात देखील चांगली कामगिरी केलेली आहे. कै.जयवंतराव भोसले यांना पश्चिम महाराष्ट्रात 'औद्योगिक समूहाचे शिल्पकार' म्हणून ओळखले जाते. कृष्णा सहकारी साखर कारखान्याचे सतत 30 वर्षे अध्यक्ष असणे ही गोष्ट देखील अतिशय लक्षवेधक आहे. आपल्याला कल्पना आहे की, सहकार क्षेत्रात प्रचंड राजकारण असते. अशा परिस्थितीत एखाद्या सहकारी कारखान्याचा सतत 30 वर्षे अध्यक्ष असणे म्हणजे सर्वसामान्य शेतकऱ्यांचा विश्वास संपादन करण्यात त्यांनी किती यश प्राप्त केले होते हे दिसून येईल.

महोदय, डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्टस् असोसिएशन, पुणे, महाराष्ट्र पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळाचे संचालक, औद्योगिक वित्तीय महामंडळ, नवी दिल्ली, या संस्थांच्या सल्लागार मंडळाचे सदस्य अशा बहुविध प्रकारच्या कार्यामध्ये त्यांचे अग्रगण्य कर्तृत्व आपल्या महाराष्ट्रात घडल्याचे दिसते. आज सहकार चळवळ पुढे गेलेली पाहायला मिळते. सहकार चळवळीमुळे सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या जीवनात चांगल्या प्रकारचे परिणाम झाल्याचे पहावयास मिळतात. सहकार चळवळीने शेतकऱ्यांचे जीवनमान बदलल्यामुळे ते आज चांगल्या प्रकारचे जीवन जगत असल्याचे दिसून येते. पूर्वीच्या कालखंडात ज्यांनी कष्टाने आणि निस्वार्थीपणे काम केले त्यामध्ये जे महनीय कार्यकर्ते आणि नेते होते त्यापैकी कै.जयवंतराव भोसले हे एक होते. मी त्यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करतो.

महोदय, माझे दुसरे मित्र कै.त्र्यंबक मुकुंदराव कांबळे होय. ते टी.एम.कांबळे या नावाने प्रसिध्द होते. माझ्या दलित चळवळीच्या कार्यकाळात म्हणजेच 1972 पासून ते माझे सहकारी होते. त्यांचा आणि माझा घनिष्ठ परिचय होता. आम्ही दोघे चळवळीत काम करताना अनेक

..2..



ॲड.जयदेव गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रसंग असे घडले आहेत की, त्यांची मला आज प्रकर्षाने आठवण येते. या निमित्ताने एक गोष्ट सांगू इच्छितो की, 1976 साली महार तथा वतनी जमिनीच्या संदर्भात मी पुण्यामध्ये काम करीत होतो. या क्षेत्रात काम करीत असताना महार वतनाच्या जमिनी बेकायदेशीरपणे हस्तांतरित झाल्या आहेत किंवा अन्यायकारकरित्या त्या लाटण्यात आल्याचे औसा तालुक्यातील एक प्रकरण माझ्याकडे आले होते. मी त्या प्रकरणात लक्ष घालून आंदोलन केले. एका सावकाराने दलित शेतकऱ्याची 28 एकर शेती बेकादेशीररित्या लाटली होती. या विषयी मी आंदोलन करीत असल्याचे समजल्यानंतर टी.एम.कांबळे हे लातूरहून माझ्याकडे आले. आम्ही औसा येथे एक जंगी सभा घेतली. त्या सभेचा परिणाम असा झाला की, ती जमीन दुसऱ्याच दिवशी त्या दलित शेतकऱ्याच्या ताब्यात दिली गेली.

महोदय, दुसरी आठवण अशी की, 1990 साली रिपब्लिकन पक्षाचे ऐक्य झाले होते. सन्माननीय सदस्य श्री.सुमंत गायकवाड यांना ही गोष्ट माहीत असेल. त्या वेळी रिपब्लिकन पक्षाच्या ऐक्याबाबत बैठक सुरु होती. त्या वेळी एक बातमी अशी आली की, काँग्रेस पक्ष श्री.टी.एम.कांबळे यांना विधानपरिषदेचे सदस्यत्व देणार आहे. या बातमीमुळे रिपब्लिकन पक्षाच्या ऐक्य बैठकीमध्ये वेगवेगळ्या प्रकारची चर्चा सुरु झाली. रिपब्लिकन पक्षाचे ऐक्य झाले असताना श्री.टी.एम.कांबळे काँग्रेस पक्षाने देऊ केलेले विधानपरिषदेचे सदस्यत्व घेणार काय ? त्यावर श्री.टी.एम.कांबळे यांनी सांगितले की, रिपब्लिकन पक्षाच्या ऐक्याला बाधा येत असेल तर मी विधानपरिषदेचे सदस्यत्व नाकारण्यास तयार आहे. त्यांनी सर्वांना सांगितले की, या बाबतीत आपण सर्वांनी विचार करुन मला सांगावे. तद्नंतर आम्ही सर्वांनी त्या बाबत विचार केला आणि त्यांना ते पद स्वीकारण्यास संमती दिली. अशा प्रकारचा अतिशय सुस्वभावी आणि चळवळीमध्ये सर्व झोकून देणारा हा नेता होता. नामांतराच्या चळवळीपासून दलितांच्या मूलभूत प्रश्नांवर काम करणाऱ्या कार्यकर्त्याचे किडनीच्या दुर्धर आजाराने निधन झाले. त्यांचे अवेळीच निधन झाले आहे. त्यांच्या निधनाने कधीही भरुन न येणारे नुकसान आंबेडकरी चळवळीचे आणि सर्व राजकीय चळवळीचे झाले आहे. मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने त्यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण करतो.

----------

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नितीन राऊत (रोजगार हमी योजना मंत्री) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते आदरणीय उप मुख्यमंत्री महोदय यांनी या ठिकाणी दिवंगत जयवंतराव कृष्णराव भोसले व त्र्यंबक मुकुंदराव कांबळे, माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल दु:ख व्यक्त करण्याचा जो प्रस्ताव मांडला आहे, त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. सन्माननीय टी.एम.कांबळे यांचे दु:खद निधन झाले, ही बातमी मला मिळाली, त्यावेळी मी दौऱ्यात होतो. जालन्याहून वाशिम जिल्ह्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर असताना ती बातमी मला समजली. मी त्याचवेळी रामदासजी आठवले यांना सुध्दा फोन लावला. मी माझ्या सहकाऱ्यांना फोन लावला. एक अत्यंत मधुर स्वभावाचे, क्रांतिकारी असे व्यक्तिमत्व टी.एम.कांबळे यांचे राहिले. माझ्यासारखा माणूस दलित पँथरचा कार्यकर्ता म्हणून नागपूरमधून उदयास आला, त्यावेळी टी.एम.कांबळे हे दलित पँथरच्या संस्थापक सदस्यांपैकी एक होते. त्यांच्या नेतृत्वामध्ये मला काम करण्याची संधी मिळाली. दलितांच्या प्रश्नांवर, मागासवर्गीयांच्या प्रश्नांवर खास करून गायरान जमिनींच्या प्रश्नांवर त्यांनी वादळ उठविण्याचे काम केले. अशा नेत्याचे दु:खद निधन झाले आहे. मी या प्रसंगी शोक संवेदना व्यक्त करतो.

----

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सभागृहाचे नेते माननीय उप मुख्यमंत्री नामदार श्री. अजितदादा पवार यांनी सर्वश्री जयवंतराव कृष्णराव भोसले, त्र्यंबक मुकुंदराव कांबळे, माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडला आहे, त्यावर सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे व इतर सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. महाराष्ट्र राज्यातील सहकार, शिक्षण, सामाजिक क्षेत्रात अत्यंत ज्येष्ठ विचारवंत अशा पध्दतीचे नेतृत्व स्व. जयवंतराव भोसले यांनी केले. पश्चिम महाराष्ट्रामध्ये कोल्हापूर या ठिकाणी सन 1940 ते सन 1945 च्या दरम्यान तालिम संघांचे नेतृत्व होते, ते नेतृत्व करण्यामध्ये सर्वश्री. यशवंतराव मोहिते व जयवंतराव भोसले हे अत्यंत प्रभावी नेतृत्व मानले जात होते.

ब्रिटिश राजसत्तेच्या अनुषंगाने त्यांना टक्कर देणारे, स्वातंत्र्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणारे आणि हे करीत असताना कोल्हापूरसारख्या एका अत्यंत लढवय्या विभागामध्ये शैक्षणिक पात्रता सिध्द करण्याच्या दृष्टीने सातत्याने अभ्यास करणारे असे व्यक्तिमत्व म्हणजे स्व. जयवंतराव भोसले म्हणावे लागेल. यशवंतरावजी मोहिते आणि जयवंतरावजी भोसले या राम-लक्ष्मण जोडीने शैक्षणिक क्षेत्रात क्रांती घडवून आणली. आम्ही सर्व मंडळी अत्यंत कुशाग्र बुध्दी व व्यक्तिमत्व असलेल्या जयवंतराव भोसले व यशवंतराव मोहिते यांच्याकडे आमचे नेते म्हणून पाहत होतो. अत्यंत ध्येयवादी कर्तृत्व असणारे, सर्वसामान्य कष्टकरी शेतकऱ्यांची सतत बाजू घेणारे, त्यांच्याकरिता लढणारे असे ते होते. महाराष्ट्राच्या सहकारी क्षेत्रातील अत्यंत उत्कृष्ट अशा कृष्णा समुहाचा पाया रचणाऱ्या 2 बंधुंपैकी यशवंतराव मोहिते साहेबांनी महाराष्ट्राचे राजकारण केले आणि जयवंतराव भोसले साहेबांनी त्या ठिकाणची संपूर्ण बैठक तयार केली. मी त्यांच्या सानिध्यात जवळजवळ 35 वर्षे होतो. त्यांच्यांकडून मिळालेले प्रोत्साहन आणि त्यांनी दिलेले शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील बळ यामुळे मी आज या ठिकाणी आहे असे म्हटले तर ते वावगे होणार नाही.

( नंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/D/KTG/ पूर्वी श्री.कांबळे 12.30

**सभापती**.....

अनेक विकास योजनांच्या माध्यमातून त्यांनी प्रगती केली. शालेय शिक्षण या विषयासंबंधी सुध्दा त्यांनी भक्कम काम केले. नवीन पिढी तयार केली. त्याचबरोबर सहकार क्षेत्रातील जो सामान्य मनुष्य आहे त्याला उत्कृष्ट वैद्यकीय सेवा द्यावी या उद्देशाने कृष्णा समूहामध्ये त्यांनी वैद्यकीय महाविद्यालय सुरु केले. त्या संस्थेकडून अत्यंत चांगल्या दर्जाची वैद्यकीय सेवा पुरविली जाते.

कै.जयवंतराव भोसले यांना श्रध्दांजली अर्पण करीत असताना मला हे सुध्दा सांगावे लागेल की, कै.भोसले हे जबरदस्त ध्येयवादाने प्रेरित झालेले, भक्कम समाज तयार करणारे नेते होते. ज्याचे स्मरण आपण सर्वांनी सातत्याने ठेवले पाहिजे इतके मोठे त्यांचे व्यक्तिमत्व होते. अशा या थोर नेत्याचे दिनांक 5 ऑगस्ट, 2013 रोजी दु:खद निधन झालेले आहे.

श्री.टी.एम.कांबळे यांचे भारतीय दलित पँथर व रिपब्लिकन पार्टीच्या उभारणीत मोठे योगदान होते. आंबेडकरी विचारांचे ते खंदे समर्थक होते. त्यांचे व माझे व्यक्तिगत संबंध होते. एक तळमळीचा व ध्येयवादी कार्यकर्ता असे मला त्यांचे वर्णन करावे लागेल. समाजाचा उत्कर्ष होण्यासाठी त्यांनी अनेकदा परिस्थितीशी संघर्ष केला. त्या उद्देशाने त्यांनी अनेक कार्यक्रमांच्या माध्यमातून मराठवाड्यामधील पददलित समाजाची सेवा केलेली आहे. श्री.टी.एम.कांबळे यांचे दिनांक 28 सप्टेंबर, 2013 रोजी दु:खद निधन झालेले आहे.

सर्वश्री जयवंतराव कृष्णराव भोसले व टी.एम.कांबळे यांच्या स्मृतीस अभिवादन करुन मी त्यांना भावपूर्ण आदरांजली वाहतो.

सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

( सदस्य उभे राहतात. )

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत शोकाकुल कुटुंबीयाकडे पाठविण्यात येईल.

-----

2....



असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

NTK/D/KTG/

**पृ.शी./मु.शी.**: शोक प्रस्तावानंतर सभागृहाचे कामकाज तहकूब करणे

श्री.अजित पवार ( उप मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, दक्षिण आफ्रिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष, भारतरत्न डॉ.नेल्सन मंडेला तसेच कै.जयवंतराव कृष्णराव भोसले व कै.त्र्यंबक मुकुंदराव कांबळे, माजी वि.प.स.यांच्याबद्दल आदर व्यक्त करण्यासाठी सभागृहाचे आजचे कामकाज तहकूब करावे, अशी सूचना मी मांडतो.

**सभापती** : सभागृहाचे नेते व माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी दक्षिण आफ्रिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष, भारतरत्न डॉ.नेल्सन मंडेला तसेच कै.जयवंतराव कृष्णराव भोसले व कै.त्र्यंबक मुकुंदराव कांबळे, माजी वि.प.स.यांच्याबद्दल आदर व्यक्त करण्यासाठी सभागृहाचे आजचे कामकाज तहकूब करावे, अशी सूचना केलेली आहे. त्यांनी केलेल्या सूचनेप्रमाणे मी सभागृहाचे आजचे कामकाज तहकूब करीत आहे.

सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या मंगळवार, दिनांक 10 डिसेंबर, 2013 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 12 वाजून 34 मिनिटांनी, मंगळवार, दिनांक 10 डिसेंबर, 2013 रोजीच्या सकाळी 11 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही